## संदर्भ

१) Bombay Gazetter.

Karnatak - Belgaum -

Nipani - P. 591 to 596.

२) Bombay Gazetter Karnatak -

३) १0 एप्रिल - १९८३ - रविवार सकाळ.

## -: वंशावळी - संबंधी :-

ऐतिहासिक घराण्याच्या वंशावळी

संपादक :- गो. स. सरदेसाई रियासतकार
यांनी प्रसिध्द केलेले पुस्तक
यांत पृष्ठ क्रं. ७० वर खालील प्रमाणे वंशावेल आहे.

निपाणकर अप्पा देसाई
उपनांव निंबाळकर, मुळचे लिंगायत पंथी,
पुढे मराठे बनले - मोडक द. गु. रा. ई.
पु. २ भाग २ पृष्ठे १८७-१९७

---

सिधगौडा

रघुनाथ

मुरारराव

१. सिधोजी उर्फ आपा देसाई.
ज. १७७४ मृ. १८३८

मुरारराव द. घो मृत्यु १८६४ — रघुनाथ

सिधोजीराव आप्पासाहेब — मुरारराव द. दि.

१. या सिदोजीचे लग्न कोल्हापूरकर शिवाजी छत्रपतीची कन्या येसूबाईशी ता. ११ जून १८०९ रोजी झाले.

..२१/-

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## प्रकरण दुसरे

## सिधोजीराव निपाणीकर देसायांच्या घराण्याचा पूर्वइतिहास

मराठ्यांच्या इतिहासात पराक्रम गाजवणारी जी काही घराणी उत्तर भारतातून दक्षिणेत आली व त्यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर शौर्य गाजवून प्रांत जिंकून आपल्या जहांगिरी निर्माण केल्या, त्यात निपाणीकर देसायांच्या पूर्वजांचा पण फार मोठा वाटा आहे.

- स्वामी श्रीमंत

सिधोजीराव देसाई, नाईक निंबाळकर सरलष्कर मूळचे घराणे उत्तर भारतातील विक्रमादित्याच्या परंपरापैकी (पोवार) विक्रमादित्याची गादी ही निपाणकराची तेथील काही घराणी दक्षिणेकडे आली. देवास महाराज हे भाऊबंद होत. हे छत्रपतींचे वडील (पोवार) धारदेवासहून काही घराणी पश्चिमेकडे आली. ते फलटणजवळ (सातारा) या ठिकाणी राहू लागली. ते ज्या गावी रहात होते त्या गावाचे नांव होते निंबस. त्या वरुनच त्यांना निंबाळकर असे नांव पडले.[१] असे त्यांचे सध्याचे नातेवाईक अंबाजीराव निंबाळकर सांगतात. निंबाळकर व फलटणचे महाराज हे भाऊबंद होत. त्यावेळी अदिलशहाने या भागावरती स्वारी केली. आणि निंबाळकराचा पराक्रम पाहून त्याने ते घराणे विजापूरला नेले. ही निंबाळकराच्या कार्याची पोच पावती होती. अतिशय शूर आणि धाडसी असे हे घराणे होते तेथे त्यांना १०० घोडयाचा प्रमुख केले. नायक केले म्हणूनच त्यांना नाईक असे आडनांव पडले.[२] याच

...२२/-

दरम्यान विजापूरच्या दरबारामध्ये असे एक घोडे होते की ते कोणालाही पाठीवरती बसू देत नव्हते. त्यामुळे ते घोडे विजापूरकराच्या - दरबारातील सर्व सरदारांना एक प्रकारचे आव्हान. हे आव्हान उचलण्यास कोणीही तयार नव्हते. पण निंबाळकरांनी हे आव्हान उचलण्याचे ठरविले. या घोडयावरती अनेक सरदारांनी स्वार होण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला होता. आदिलशाहाने सर्व दरबारातील सरदारांना असे आव्हान दिले होते की कोणी या घोडयावरती स्वार होईल आणि घोडयावरुन जितका प्रदेश फिरुन येईल तितका सर्व प्रदेश दसकत म्हणून दिला जाईल. मात्र या प्रदेशातील १/४ हिस्सा आदिलशाहाला मिळावा. निंबाळकरांनी प्रयत्नाला सुरुवात केली.

ते सुर्योदयाच्यावेळी एका तुळीवरुन घोडयाच्या अंगावरती उडी घेतली. सुरुवातीला घोडयाने अंगावरती बसू दिले नाही. बराच वेळ निंबाळकरांनी अयशस्वी प्रयत्न केला. पण कालांतराने त्यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले. आणि ते अखेर त्या वावट घोडयावरती स्वार झाले आणि घोडयाचा लगाम खेचला. त्यांनी त्या घोडयावरुन हुवेकरी बेळगांव दांडेली या भागातील १७३ खेडी फिरुन ते घोडा घेऊन परत आले. घोडा घेऊन ते दरबारात आले. घोडयावरुन उतरले. पण त्याच वेळी त्यांचा घोडा १७३ खेडयांचा प्रवास करुन आलेला असल्यामुळे तो थकला होता. भुकेलेला होता. त्यामुळे काही कालावधीतच मृत्युमुखी पडला. आदिलशाहाने निंबाळकरांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे १७३ खेडयाची देसकतीची चिठ्ठी दिली. त्यांनी ती सनद घेतली अशाप्रकारे नाईक निंबाळकर येथून ते नावारुपाला आले. सर्व सरदारांच्या आणि आदिलशाहाच्या

तोंडी निंबाळकर घराण्याचे नांव येऊ लागले. त्यांना ही सर्व आदिलशाहाकडून देसकत मिळाली म्हणूनच त्यांना देसाई हे आडनांव पडले.[3] तेथून ते नणादी या ठिकाणी स्थायिक झाले. येथे त्यांची वंशावेल वाढली. यातील एक घराणे परत पश्चिमेकडे निघाले आणि ते अक्कोळला आले. या ठिकाणी त्याचा वाडा आहे. सध्या हायस्कूलची जी इमारत आहे तो त्याचा वाडा होता. यातील आणखी एक घराणे अर्जुनी निपाणीच्या पश्चिमेला आले. ते त्याठिकाणी स्थायिक झाले. अकोळचे घराणे हेच निपाणीला कालांतराने देसाई नाईक निंबाळकर या नावाने ओळखले जाऊ लागले.

काही कालावधीनंतर देसाई देशमुख वगैरेच्या सत्तेचे रूपांतर छोटया मोठया सरंजामदारी सत्तेत होऊ लागले. पूर्वेस निजामशाही, दक्षिणेस मैसूर उत्तरेस पेशवाई. अशा तीन सत्तांचा उगम याचवेळी होत होता. नाईक निंबाळकराचा हा परगणा पेशव्यांनी जप्त केला. परंतु १७७१ मध्ये देसायांनी निपाणी, जत्राट कोडणी, शिरगुप्पी, कोगनोळी, कुरगांव, मत्तिवडे, कणगले या हुक्केरी प्रांतातील गावाची देसकत पेशव्याकडून परत मिळविली. अशाप्रकारे विजापूरहून आलेले घराणे नणादी, अकोळ आणि अर्जुनी या ठिकाणी स्थायिक झाली.[४]

या घराण्यातील सिधोजीराव देसाई नाईक निंबाळकर सरलष्कर हे सर्वात शूर योध्दे मुत्सद्दी म्हणून १८ व्या शतकाच्या शेवटी व १९ व्या शतकाच्या आरंभीच्या काळात उदयास आले. तरी पण सिधोजीरावाच्या पूर्वी त्यांच्या काही पूर्वजांनी महत्वाची

कामगिरी केली असल्यामुळे त्याच्या संबंधी जी काही त्रोटक माहिती उपलब्ध आहे. ती याठिकाणी देणे अप्रस्तुत ठरणार नाही. म्हणून माहिती मी देण्याचा प्रयत्न करीत आहे.

भारत इतिहास संशोधन मंडळात हयात घालविलेले थोर संशोधक कै. ग.ह.खरे यांनी निपाणीस येऊन त्यांच्या नातेवाईकांकडून विचारपूस करून काही जुनी दप्तरे अभ्यासली व काही कागद शिवचरित्र साहित्य १२ व्या खंड मध्ये निपाणी - देसाई या नावाखाली प्रसिध्द केली हे कागद प्रामुख्याने मुरगोड, हुकेरी व निपाणीकर देसायांचा पूर्व इतिहास समजण्यास मदत होते. म्हणून ते कागदपत्र मूळातच वाचण्यासारखे व ज्ञानात भर टाकणारे असल्याने मी पुढे देत आहे.

त्यापैकी पहिला कागद हा २८ जानेवारी १६५४ चा असून हा रायाप्पा देसाई, मुरगोड यांच्यासंबंधी असून तो पुढील प्रमाणे -

ले. १ सु. १०५४ ) ( श. १५७५ माघ वद्य ६
रवल १८: सन १० )(आरंभी वा.फा.शि.)( इ. १६५४ जानेवारी २८

अमदतुल अमासिल वल येकरा मोकदम अल इमसाल रायेपा देसाई पा मुरगोड बइनायेत इलतिफात उमेदवार बूदा बिदा बुदा आर्बा खामसैन अलफ दरी विला तुह्मांबावे मुजाअतशार (मो.जा.) लिहिले की पा मजकूर व कारा ससिगेरा मधो सिबिये खारकशा होते त्यावरी सिंपेचे निवाडा करून तीनी हिसे जमीन तुम्हाकडे केले तुम्ही सरकारासी सिंणी मोबलगे सासे पांच हजार कबूल जाहालासी मिंजुमले साल मजकुरी होनू दिडी हजार उसूल करून द्यावे उरले च्यारी हजार करारती सन इसनेपैकी

७०० सातशे येसे जुमलतानी बेरीज ४७०० च्यार हजार सातशे उरले यासी उसुलाती इजा सन खातम खमसैन पासुनी ४ साली च्यार हजार दर साले येक हजार प्रमाणे हसूल करावे उरले होनू सातसे पांचवे साली द्यावे येसे करारदाद केले आहे दरी बाब तुज कौल सादीर होये म्हणून तरी बिनाबंरा सदरहू हकीकत खातिरेसी आणोन कौल सादीर फर्मा विले असे आपले खातिर तसला करार राहून बहहुकूम करारबाद मुजाअत शार (सी.जा.) जर मजकूर उसूल करून सरकारचे दौलतखाही करणे दरी बाब खातिरजमा राखोनी विलायेंती फिर्दीमासुंरी कीजे हा कौल सही तो छ १८ माहे सौवाल सन १०६४.[५]

(ल. व. अ. मो.)

(पाठीवर उजव्या बाजूस समासंत फार्समध्ये) बतारीख १७ शाव्वल दाखिल वाकअह शुद

| | | |
|---|---|---|
| ले. २ रा शा. ३ नल<br>मार्गशीर्ष वद्य १ इंदु | श्री | ( इ. १५९८ मार्गशीर्ष वद्य १<br>( इ. १६७६ डिसेंबर ११ |

(आरंभी "प्रतिपत" इत्यादि अष्टकोनी शि. आणि ३ व ४ या ओळीच्या डाव्या अंगास बदामी आकाराचा) श्री. शिवचर णीतत्पर त्र्यंबकसुत मोरेश्वर (असा शि.) स्वस्ति श्रीराज्याभि षेक शक ३ नल सवत्सर मार्गसीर्ष वदि प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्रीराजा शिवछत्रपति याणी रुद्रपा नाईक देसाई पा। मुरगुड यांसी आज्ञा केली येसी जे तुमचा मुतालिक येनपा हुजूर आहे त्याणे सांगितले की रुद्रपा स्वामीचे कामावरी येख्तियार होऊन भुजबलगडीचह कामाबद्दल वड- उपर व मोपबराबरी नागणागौडा पाठविले होते त्यास वाटेस तोरगल- करांनी जिवे मारिले त्याकरिता दिगिरी धरली की साहेबकामास अंतर



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पडिले म्हणून तरी तुम्ही काही फिकीर न करणे स्वामीचे सेवेस येक्षियार जाले आहा साहेब काम उदंड कराल यैसेक स्वामी समजले असेती बहूत काही काम तुमच्या हाते धेऊन तुम्हांस सफराज करुन यैसा दिलासा असो देणे साल मजकूर सन सबा सबैनाकारणे स्वामी तुमचे परगणियाचा काही खंडणी अगर पैका धेत नाही तुम्हास माफ केले असत तुम्ही साहेबाचे तर्फेने कुली रुजवातीने वर्तणूक करुन गनिमांचे लोकांस शोरामाल देत जाणे का कडकोली गनिमाचे ठाणे आहे तेही उठवून तेथे आपले ठाणे बैसे ते करणे व वरघडा ही जागा जागांची ठाणी गनिमाची उठउन देणे स्वामीही तुमची हर बाब मदत करीवितील तुम्ही साहेबकाम चालवित जाणे भुजवलगडीची बहूत काही मदत हा येक बाबेने करुन आपले चाकरीचा व रुजवातीचा व येक्षियारीचा मजुरा करुन दाखवणे की स्वामी तुम्हावरी पुढेंही मेहरवानी करोत ते करणे (नि.) लेखान सीमा (ष.) मर्या । दिये विरा । जते । (पाठीवर - शेरे) चद्र मास मार्गशीर्ष सुरु सुद बार.

ले. ३ रा. श ६ (श. १६०२ वैशाख वद्य ४

रौद्र वैशाख वद्य ४ भृगु ( इ. १६८० मे ७

(आरंभी संभाजीचो पुढीलप्रमाणे षोडशदली मुद्रा) श्री । शंभोम्र शिवा जातस्य मुद्रा द्यौ । रिव राजते । कसेविनो लेखा । वर्तते कस्य नो । परि

स्वति श्री राज्यभिषेक शकें ६ रौद्रनाम संवत्सरे वैशाख बहुल चतुर्थी भृगुवासरे क्षत्रिये कुलावंतस श्रीराजा शंभू छत्रपति याणी रुद्रपा देसाई प्रा मुरगोड यासि दिल्हे अभयपत्र ऐसे जें तुमचे विषई देवजी श्रोखंडे हवालदार शा कटोरगड याणी स्वामीचे सेवेसी विनंतीपत्र लिहोलें की रुद्राप्पा देसाई आपले विलातीचे फुडील सालाचे

खंडणोचा तहरह होणे आहे त्यानिमित्त मुतालीक स्वामीचे पाठवणार आहेत तरी स्वामीन येक अभयपत्र देसाई यांस पाठविलियां उमेदवार होऊन स्वामिकार्यी तत्पर राहातील म्हणू (नंत) रविस्तर लिहीले त्याबरुन स्वामी तुम्हवरी कृपाळू होऊन अभयपत्र दिले असे तुम्ही आपला मुतालीक स्वामिसन्नीध पाठणे अंत:कर्णास आणून स्वमी जेणेप्रमाणे राजश्री (मो.जा.) कैलाशवासी स्वामीने खंडणी बांधीन दिल्हे केली आहे तेणेप्रमाणे करीतील येविषंई तुम्ही आपलें समाधान असों देणे आणि स्वामीसेवेशी तत्पर असोन वर्तणूक करीत जाणे येविषई असे (नि.) लेखांनाकािर (प.मो.) मर्या I देय विज I यते (पाठीवर नि) सुरु सूद.

ले. १ सु. १०५४ ) ( श. १५७४ माघ वद्य ६

रवल १८, सन १० ( इ. १६५४ जानेवारी २८

आरभी वा. फा. शिा.

अमदतुल ससासिल वल येकंरा मोकदम अल इमताल रायेपा देसाई पा मुरगोड बडीयेत इलातिफत उमेदवार बूदा बिा मुा आबां खमसैन अलफ दरी विला तुझें बावे सुजाअतशार (मो.जा.) लिहीले कीं पा मजकूर व कार्या ससिगेरामध्ये सिवेंचे सरकशा होते त्यावरी सिवेचे निवाडा करुन तीनी हिसे जमीन तुम्हाकडे केले तुम्ही सरकारसी सिणी मोबलगे पांच हाजार कबूल जाहालासी मिंजुमले साल मजकुरी होनू दीडी हजार असूल करुन द्यावे उरलें च्यारी हजार करारसी सन इसने-पैकी ७०० सातसे येसे जुमलतानी बेरीत ४७०० पासुनी ४ साली च्यार हजार दर साले येक हजार दर साले येक हजार प्रमाणे उसूल करावे दरलें होनु सातसों पांचवे साली द्यावे येसे करारदाद केलें आहे वरी बाब तुज कौल सादीर होये म्हणोन तरी बिनांबरा सदरहू हकीकत

खातिरेसी आण्यैन कौल सादीर फर्मा बिले असे मापले खातिर तसला करार राहून बरहुकूम करारदाद मुजाअत शार (मो.जा.) जर मजकूर उसूल करुन सरकारचे दौलतखाही करणे दरी बाब खातिरजमा राखोनी नियेती किर्दीमामुरी कीजे हा कौल सही तारी छ १८ माहे सोवाल सन १०६४

(ल.व.अ.मो.)

(पाठीवर उजव्या बाजूस समासांत फार्सीमध्ये) बतारीख १७ शव्वाल दाखिल वाकअह शुद

ले. २ रा. शा. ३ नल ) ( इ. १५९८ मार्गशीर्ष वद्य
मार्गशीर्ष वद्य १ इंदु ) श्री ( इ. १६७६ डिसेंबर ११

(आरंभी "प्रतिपत" इत्यादी अष्टकोनी शि. आणि ३ व ४ या ओळींच्या डाव्या अंगास बदामी आकाराचा.) श्री ा शिवचर ा णीतत्पर त्र्यं ा बकसुत मोरेश्वर ा (अस शि) स्वास्ति श्रीराज्याभिषेक शाक ३ नल सवत्सर मार्गशीर्ष वदि प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रिय - कुलावसंत श्रीराजा शिवछत्रपती याणी रुद्रापा नाईक देसाई पा ा मुरगुड यांसी आज्ञा केली यैसी जे मुमचा मुलालीक चेनपा हुजूर आहे त्याणे सांगितले की रुद्रापा स्वामीचे कामावरी येखियार होऊन भुजबागडीचे कामाबद्दल वडउपर व मोपबराबरी नागनगोडा पाठविले होते त्यास वाटेस तोरगलकरांनी जिवे मारिले त्याकरीतां दिगिरी धरिली कीं साहेबकामास अंतर पडिले म्हणून तरी तुम्ही काही फिकीर न करणे स्वामीचे सेवेस येखियार जाले आहा साहेब काम उदंड कराल यैसे स्वामी समजले असेती बहुत काही काम तुमच्या हाते घेऊन तुम्हास सर्फराज करुन यैसा दिलासा असो देणें साल मजकूर सन सबा बबैना करणे स्वामी

तुमचे परगणियाचा काही खंडणी अगर पैकी पैका नाही तुम्हास माफ केले असे तुम्ही साहेबांचे तर्फेने कुली रुजवातीने वर्णणूक करुन गनिमाचे लोकांस गोसामाल देत आणो का कडकोली गनिमाचे ठाणे आहे तेही उठउनू तेथे आपले ठाणे बैसे तें करणे व वरकड ही जागाजागांची ठाणी गनिमाची उठउनू देणे स्वामीही तुमची हर बाब मदत करिवितील तुम्ही साहेबकाम चालवीत जाणे भुजवलगडीची बहूत काही मदत हर येक बाबेने करुन आपले चाकरीचा व रुजुवातीचा व येकिस्मारीचा मजुरा करुन दाखवणे कीं स्वामी तुम्हावरी पुढेंही मेहरबानी करीत ते करणें (नि.) लेखान सीमा (प.) मर्या देयं विरा (पाठीवर शेरे) चंद्र मास मार्गशीर्ष मार्गशीर्ष सुरु सुद बार

ले. ३ रा. श. ६ ) (श. १६०२ वैशाख वद्य ४
रौद्र वैशाख वद्य ४ भृगु ) ( इ. १६८० मे ७

(आरंभी संभाजीची पुढील षिडशदली मुद्रा ) श्री शंभो: शिव जातस्य मुद्रा द्यौ रिव राजते यदं कसेविनो लेखा वर्तति कस्य नो परि

स्वस्ति श्री राज्यभिषेक शकें ६ रौद्रनाम संवत्सरे वैशाख बहूल चतुर्थी भृगुवासरे क्षत्रिये कुलावतंस श्रीराजा शंभू छत्रपति याणी रुद्रपा देसाई प्रा भुरगोड यासि दिल्हे अभयपत्र ऐसे जें तुमचे विष्ण्ई देवजी श्रीखंडे हवालदार प्रा कटोरगड याणीं स्वामीचे सेवेसी विनंतीपत्र लिहीले की रुद्रापा देसाई आपले विलोतीचे पुढील सालाचे खंडणीचा तहरह होणे आहे त्या निमित्त मुतालीक स्वामीचे सेवेसी वाजवणार आहेत तरी स्वामीन येक अभयपत्र देशाई यांस पाठविलीयां उमेदवार होऊन स्वामिकार्यी तत्पर राहातील म्हणू (मं.) सविस्तर लिहीले त्यावरुन स्वामी तुम्हावरी कृपाळू

होऊन उभयेपत्र दिल्हें असे तुम्ही आपला मुतालीक स्वामिसन्नीधा पाठवणें अंत:कर्णास आणून स्वामी जेणे-प्रमाणे राजश्री (मो.जा.) कैलासवासीस्वामीने खांडणी बांधोन दिल्हे केली आहे तेणेप्रमाणेच करितील येविषाई तुम्ही आपले समाधान असों देणे आणि स्वामिसेवेसी तत्पर असोन वर्तणूक करीत जाणें येविषाई अभाये असे (नि.) - लेखनालंकार (छा. मो.) मर्या I देयं विज I यते (पाठीवर नि.) सुरु सूद

ले.४ रा.श.६ रौद्र जेष्ठ शुध्द ११) (श. १६0२ जेष्ठ शुध्द ११ भृगु जवळ ९ ) श्री (इ. १६८0 मे २८

(संभाजीचे ले. ८७ प्रो मुद्रा.)

स्वस्तिश्रीराज्याभिषेक शक ६ रौद्रनाम संवत्सर जेष्ठ शुध येकादसी भृगवासर छत्रियेकुलावतंस श्रीराजा शंभू छत्रपति याणी रुद्रापा देसाई पा। मुरगुड यासि आज्ञा केली यसी जे तुम्ही माणको रुद्र मुतालीक हुजूर पाठविला साल मजकूर सन इहिद्दे समानीनाचे विलायेती खांडणीविशाई विनतिपत्र व याणे रदबदल केली त्यावरुन खांडणी व भेटी नि। होन १00000

येन खांडणी ९५00 भेट ५000

येकूण होन दाहा हजार रास केले जिकडे देवऊन तिकडे आदा करणे आणि विलायेतीची संवणीबादानी करुन सुखा असणे कोणे बाबे शाक अदेशा न करणे सदरहू खांडणी कुल बाब कुल कानू केली असे उसूल हाडियानसी देवून सुखे असणे येविशाई अभाये असे (नि.) लेखनालंकार (ले. ८७ प्रो. मो.) रूजू सुरुनिवीस छ ९ जमादिलावल सुरु सूद बार

ले.५ रा.श.७ रौद्र ) (श. १६०२ भाद्रपद शुध्द १४
भाद्रपद शुध्द १४ मुंद ) श्री (ई. १६८९ ऑगस्ट २८

(चौथ्या व पांचव्या ओळींच्या डाव्या अंगास पुढीलप्रमाणे ल. शि.)

लक्ष्मी नृसिंहभ । त्क श्रीनीरेरायाब्धिध । सन्मणे: ।। प्रल्हादव । र्धिनी मुद्रा । प्रल्हादस्य । विजुंभते

स्वस्तिश्रीराज्याभिषेक शक ७ रौद्र संवत्सरे भाद्रपद शुध चतुर्दसी मंदवासरे आज्ञा केली यैसीजे तुम्हीं विनतिपत्र पाठविलें ते पावलें कितेक आपलें रुजुवातीचें व पा। मजकूरचें वर्तमान कितेस तपसिलें लिहिलें ते कळों आलें जैसी तुम्हीं रुजवाती धारिता तैसी स्वामीचीही कृपा तुम्हांवरी आहे तुम्हीं आपलें समाधान असों देणें आणि येकनिस्ठतेनें स्वामीसी रुजुवात करुन वर्तत जाणें व परगणे मजकूरची खंडणी करुन यैवज कटोरगडये तनखियास व इमारतीस देविला तो आज्ञेप्रमाणें सरंजाम करुन देत असतां विठल हरि या प्रांते आले आहेती ते आपणावरी किरकोळ वराता करुन उपद्रव देतात्ती येण्हेंकडून गडास यैवज पावावयास खलेल होतें यास काये आज्ञा म्हणून तपासिले लिहिलें तरी विठल हरीस वराता करायास गरज नाही त्याला रोखा पाठविला असे तो पाववणें त्याच्या वरातप्रमाणें कोण्हास काही आदा न करणें खंडणीप्रमाणें यैवज कुटोरगडये तनखियास व इमारतीस देविला आहे तो वरिच्यावरी देत जाणें तनखियाची बेगमी होये इमारतीस यैवज पावोन काम चाले तें करणें व बाबाजी रखमागंद सुभेदार बेटगिरें याणी मौजे उमली गांव व इगलगी आपल्याकडील मारुन नेले गुरेढोरें नेलीं पेवें काढून गला नेला याकरिता मौजे मजकूरच्या रयेतानी धास्त घेतली आहे व पा।

मजकूर खाराब होऊं पाहतो तरी येविशीं त्यांला आज्ञापत्र देऊन गुरेंढोरें मला देविला पाहिजे म्हणून लिहिलें तरी रोखा पाठविला असे तो देणें त्यावरुन ते जें नेलें असेल तें सोडून देतील तुम्हीं रयेतीस दिलासा करुन रागणें किर्दीमामुरी करुंन खुशाहाल राहेत तें करणें व संतेगिरेकरानी कथाला करुंन गांव मारिले गुरें व सेलिया नेल्या त्यांची पाठी नारो अंबाजी सुभेदार राखाताती आणि यैसी तसवीस देविताती तरी याविशीं आज्ञा केली पाहिजे म्हणून लिहिलें तें लिहिल्याप्रमाणें कलों आलें त्यावरुंन नारो अंबाजीस रोखा पाठविला असे तो पाववणे संतेगिरेकरास ताकिद करितील हालखुद ठेवितील जाणिजे (नि.) लेखानालंकार

(ले. ८७ प्रा. मो.)

(पाठीवर) (निं.) पौ छ १४ साबान रुजू सुरु निवीस सुरु सुद

ले. ६ सु. १०८७ ) ( श. १६०८ श्रावण वर्ष ९
रमजान २१ ) श्री ( इ. १६८६ आगस्ट २

राजेश्री नरहरी बलाल सुभेदार व कारकून प्रांत तोरगल गोसावी यासी

ई अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य (मो. जा.) सेवक यादव कोनेरी सरसुभेदार व कारकून सुभेहाये प्रांत भुजबलगड नमस्कार सुहूर सन सबा समानेन अलफ सांप्रत दोडवाड बेलवडीस धारवाडकर गमिमानी येऊन डाणें घातलें त्यास मारुन काहडावयास जमाव करुन भागवंतपुरास

आलों मनपा देसाई पा। मुरगोड याकडील जमाव मसलतेस घ्यावें आणि येथील तहरह करावा म्हणून तळूरास आलों देसमुखाने येऊन भेटी घेतली ते समई तुम्ही देसमुखाचें वर्तमान सांगितले कीं बहूतच येकनिष्टेने वर्तती पूर्वीं माहराज राजश्री कैलसवासी साहेबांची भेटी घेऊन आपली हलालखोरी दाखऊन माहराज साहेबांचा लेंक म्हणून घेतला आहे वर्तणूकी तसीच करितो सांप्रत पातशापूरकर रहीमदादखान गनीम याने येकदोनी वेलां पा। मजकूरचे विलासीस हयाल जाला होता त्यास मारुन चालविले हमसाई देसकानी धारवाडकर व पातशापूरकर गनिमांसीं मिलोन त्याचे सुखोने राहिले आहेती तसा हा काही त्यास मिलाला नाही व स्वामीबराबरी मसलतेस आपला जमाव घोडे व स्वार दिल्हा आहे माहराज साहेबांचे पायासीं बहूतच तत्पर आहे यैसियास ये प्रसंगी स्वामी यावरी कृपाळू होऊन येक गांव उमली करुन दया आपला देशउदंडच शा। आहे आणि खराब पडीही पडली आहेत यास येक गाऊं उमली करुन दिल्याने तितकियाने काही उणे होत नाही परतु देसाई मार यामागें येकनिस्टेनें राहिला त्यावरुन विशेच सेवेस तत्पर वर्तेल म्हणून वर्तमान सांगितलेयावरुन विचार मनास आणितां तुम्ही सांगितलें हे येथार्थच देसाई मारास येक गाव उमली करुन दयावा हे तजवीज तुमच्या आमचे मतेंकरुन मौजे मरकुबी पा। मजकूर रकम निशानी होनू २५00 आडिचसें होनू रास हा गाऊ कुल बाब कुल कानू देसाई मजकुरास उमली कुकासा करुन देविला असे तुम्ही दुमाला करुन देणे उजूर न करणें तालीकलिहून घेऊन असल परतून देणे जाणिजे (नि.) रा। छ २१ रमजान (नि.) लेखन सीमा (अष्ट.) ले । खानसी । सा (नि.) सदरहू गाव आजीबाद देहशाडियांत देवून हर साला ताजे सनदेचा उजून न करणे लेखान सीमा (अष्ट.) ले । खानसी । सा
(शेवटच्या दोन ओळीचे डावे अंगास अष्ट. बा. शि.)

ले. ७ सु. १०९३, हि. ) (श. १६१५ मार्गशिर्ष शुध्द १०
११०५ रखार ९ ) ( इ. १६९३ नोव्हेंबर २७

(पहिल्या दोन ओळींच्या डाव्या अंगास चौरस अ. शि.)

दि अज रखतखाने मा आनाम राजश्री मालोजीराजे घोरपडे साहेब दामदौलतहू (मो.जा.) ता कारकुनानी हाल व इस्तकबाल देसाइयानी व देसपांडियानी व नाडगौंडा व मोकदमानी व पटवारियानी व रयांनी व मुजेरयांनी स ।। तुंब पा हौन गुंदा सरकार मुदगल मुबे दारूलजफर विज्यापूर विदानद सु ।। सलास तिसैन आलफ दरवड़ो बा इनाम आज -हा म-हामत बोरो मा बापू पंडीत वैदयराज जुनारदार सेखानि छोडविला ... यास इनाम दर सवाद का मजकूरपैकी खालसात आवल किर्दी जमीन वजन ८८ T. पावशेर का मजकूर हौन २८ दोन जमीन अंज -हा म-हामत केले असे देखील माहसूल नखतयाती व बाजे उजुहाती वसले बैल व जंगमपट्टी व जर बैले कटी व सिके हुमायू व तूटपटी तोफेपटी व मोहीमपटी व मेजवानपटी व इनामतीपटी व हक देसाई व देसकुलकर्णी व नाडगौडा व दरी बाब तुंबाखू व गांवनगाफ लावणीची तकसीम व सादिलवार व मोईन सादिलवार व बेटबेगार व नकद यैन जिनस साईर कानूबाबहाये कदमी व जदीद पटीहाये देखील हकदार कूल बाब व कूल कानू दुमाला केला असे सदरहू इसमास हद महदूद घालून दुबाला कीजे याचे अवलियाद व अफवादा पडी व दर पिडी चालविजे मालमी व कदमी व इस्मी व रस्मी दिल्हे आसे यांस हिंदू आगर मुसलमान होऊन इसकील करीत त्यास आपले महजबापो बुरा सौगंध असे दर हर साला ताजा खुदखाताचा उजूर न कीजे तालीक लिहून घेऊन असल खुर्दखत

इनामदार मारास परतून दीजे मोर्तब सूद सन ११०५ (ब.अ.मी.)

तेरीख ९ माहे रबिलाखार.

ले.८ मु.१०९८ (९९), ) (श. १६२० भाद्रपद शुध्द २
आलमगिरी जु.४२ रवल १ ) (इ. १६९८ आगस्ट २७

(आरंभी उजव्या अंगास "कट्टीराम इब्न जगतसिंघ राठोर बन्दह दर्गाह ३७" बु असा वा. फा. शि.)

अज सरकार माहराज राजेश्री (मो.जा.) राजाजी किलेदार किले कटोरगड व फौजदार जागीदार परगणे मुरगोड वगैरे तांहा रुद्रपा वलद मनपा देसमुख परगणे मा। सूर सन समान सितैन सन ४२ जुलूस वाला दरी विले हरसाल गनीमतर्फेचा लस्कर रेज लाऊस विलोयेतीत सरनास करुन मसेसी मोबलग घेऊन गेले व साल मजकुरी धनाजी जाधव व हिंदूराऊ घोरपाडा येऊन कसबेचे नालेनजदीक उंतरोन पेव काहाडून माहासूल व कडबा यारुन खराब करीत असतां तुज हुकूम फर्मा विले की तुवा जमीदार पातशाही हलालनमकी नेकवाई जाहीर करणे म्हणोन रजा बा। तुवां आपला जमाऊ व सिबंदी ठेऊन जिवेनसी येखयार होऊन किलेसी व पा। मासी सामील होऊन ठाणेचे गडी राखून आपली जमीनदारीचे हद दाखाऊन मुजरा केला बाजद गनीम जर दूर होऊन गेला त्यावरी तुज सिरोपाऊ देणेसास्ते हुजूर बोलाविलेवरी तुवां हुजूर येऊन अर्ज केला कीं अपले घराणे थोर कबिलदार असो साहेबी सिरोपाऊ दिल्हेयां फाटून जाईल फाटेनासा रिखो इनाम दिल्हेयां पेटभरी रोटी खाऊन साहेबाकामावरी साबूत राहत जाऊं येक इनामगांव उमली नजर इनायेत करुन मरहमत करणेस रजा फर्मावणे म्हणोन आर्ज केला बराये अर्ज

हातिरेस आणोन माहातकदीम उमली गाऊं व हकवर्तना कमतकवा मुदामद होरीज करुन हाली मौजे करतुंबी पाा माा तुज उमली इनायेत करुन कुल बाब कुल कानू दिल्हे असे आवलीयांद व अफवाद हाऊन दिवाणा कारकाजवरी साबुत राहून विलायेती किर्दी आबादार करुन जमीदारीचे हद रवेशीने राहात जाणे (निं.) तेरीस १ माहे सौवाल (निं.) मोर्तबसूद (पाठीवर.) मा

ले.९ पाो सु.(२१ं) १०४) ( श. १६२६ चैत्र शुध्द २
जिल्हेज ) श्रीराम ( इ. १७०४ मार्च २६

अखंडितयेस्वरिये अलंकृत लक्ष्मीप्रसंन परोपकारमूर्ती माहामेरु राजमान्ये राजेश्री आंबाजी विस्माक्षीपंत मुाा देसाई पाा हुकेरी गोसावी यासि

.।। ई स्नेहपूर्वक सिदपा नाईक रेवणा देसाई नाडगोडा पाा गोकाक शरणाशरणार्थी विनति उपरी येथील क्षेम जाणऊन राउली उपले क्षेमसमाचार लिहीत गेले पाहिजे, विशेष सांप्रत राऊलांकडील वर्तमान कलत नाही आता सविस्तर वर्तमान लिहून पाठविले पाहिजे यानंतर हुकेरीहून फौजदार साहेबानी धावधावा पाहाणेस आले असता फिरऊन जाता मौजे धुपदहाल व बडगीपड व पासलदीनीचे - जमीनेमध्ये दगड घालून आपले सीव अहे म्हणून सांगून गेलेवरी मागुती चारी दिवसावरी अम्हस येक... लिहून पाठविले की अम्ही तिनी गांवीचे जमिनेमधे फत्तर घालून आलो असों अम्ही माळमातीने घातले अहे तुमचे तर्फेने येक भला माणूस पाठऊन देणे सिरदाणा व नाराट्टोलकरांस सिविस पाठऊन देणे ढेपा चालऊन हदमाहादुद घालून पाठवणे म्हणाऊन

लिहिलेवरुन आम्ही त्यास जबाब लिहून पाठविलें की हुकेरी व गोकाक निजपपासून सिवेचे कुसूर काही आले नाही इतकेवरी ढेपा चालवणे म्हणाल तरी बरे सिरढाणकार येऊन ढेपा घेऊन चालिले या जागा... असल तैसे निवडल म्हणाऊन पाठविलेवरुन तेही आपणाकडून रा। गोविंद वेंकाजी पंतखेडादार कबूर व तिमणा कुलकर्णी नुडस व सिरढाणकर व नारा टेहालकार यैसे गावकारांस पाठविले अहे तेही धुपदहालाचे कमतामधे येऊन उतरले अहे पहिले ढेपा चालऊ म्हणत होतीं अंतां ते गोष्टी सोडून हकनाहक अपणा अदगड जेथून घालू तेथून जमीन घेऊ यास दगड घाले मार्फीक माहजर करुन देणे म्हणून परवाना लिहून पाठविताती यैसेयास नवी जिकीर केल्या होत नाही बहुत दिवसा पासून अमचे वडीलवडिलाचे देसगतीचे वडील नादणूक केले असतां काही कसून अले नाही गोसावही पुरांत आहां तुम्हासही वडिलाच असल अतां कबूरकार नूतन राजकारण करुन शरा (र.) त मांडिली अहे हे वर्तमान सोसाविंयास विदित अहे की नाही हे कळत नाही यैसेंयास अंता तुम्ही ते स्थाली असतां पाडगिराचि हद जैसे अहे तैसे बरे नीती मनास आणून धर्मता करुन भोंडा चालविजे सारिखेकरुन फौजदार साहेबासही मा... सागून कबूरकरास ताकीद करवाऊन अपले मर्यादा जेथे अहे तेथून भोंडा चालती सारिखे करणे तुम्ही तो नाडगोराचे चालिती जाणत अहा ते लिहिणे काये अहे यैसे गोस्टीने निवडीत असता स्थालेमधे काये प्रयोजन अहे राऊल विकेकी अहा जणेकडून उभयता देसगतीमधे कुसूर न लागे तैसे विवेक करणार जाणते आहा ख्रकि यानसी राजगृहकडून बलातकारे जोरावारीने दगड घातलेयां ते काही प्रांत लागणार नाही निधान अम्हास व तु म्हास..

..३८/-

सते गोस्टीचे तजवीज व पेशाअंदेशा येऊन लागल मुख्य गोस्टी कथाला केलियामधे काही फाइदा नाही यांनिमित्य लिहिले आहे हर येकविशी उभाये देसगीधे विवेक हा ( हो ८ ये तो अर्थ केला पाहिजे गोसावी विवेकीं असा विशोष काये लिहिणे ( नि. ) हे विनति ( अ.वा.का. मो. ) पा छ १ जिल्हेज सन अर्बा मया.

ले. १० रा.श.३४ ) ( श. १६३० वैशाख शुध्द २ सर्वधारी वैशाख शुध्द २ रविवार) श्री ( इ. १६०८ एप्रिल ११

( ४ व ५ ओळींच्या डाव्या अंगास " श्री. । शिवनगरपतिह । र्निधान मोरेश्वर । सुत नीरव मुख्य । प्रधान " असा लं.व.शि. )

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारीनाम सवत्सरे वैशाख शुध्द व्दितीया रविवासर क्षत्रीयकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणि बसपरभू देसमुख पा हुकेरी यांसी आज्ञा केली येसीजे मजती पामजकूर अज देहे २९ पैकी तुम्हाकडें गांव ८ आठ बीता

| | | | |
|---|---|---|---|
| वटमरी १ | मास्तेहल १ | मजती खुर्द १ | जिमगरव्हाल १ |
| जऊबतरज १ | ठाणे बतरगे १ | मनीहोल १ | घोडगिरी १ |

येकूण आठगाव तुम्हाकडे आहेत ते करार करून बाकी गाव २१ येकवीस गाऊ पवित्रगडाकडे बीता

| | | | |
|---|---|---|---|
| कणगुती १ | सिडिलेहाल १ | कुरणी १ | बीरनहाल १ |
| इगली १ | हसून १ | घोरनहाल १ | येरगठे १ |
| बडकुदरी १ | बिडकी १ | मुरगनूर होसपेठ१ | रामनकटे १ |
| माणगाऊ १ | हुवनूर १ | कसबा मजती १ | खानापूर १ |
| चिकलगाऊ १ | ईचनहाल १ | नागनूर १ | गुडकेतर १ |
| आकोले १ | लग. | | |

येकूण येकवीस गाव कर्यात मजकूर याशिवाय गाव ५
कार्यात मुनोली ३ कर्यात कबूर २

येणे प्रा सवीस गाव किले मजकूरचे यैवजी करार केले असेत तरी तुम्ही सदरहू गावीचा यैवज होईल तो किलो मजकुरास पावता करणे. ( नि. ) निदेश समक्ष (छा. मो. ) मर्या T देयं T राजते (पाटीवर) बार सुरूद बार.

ले. ११ मु. ११२३ )                    ( श. १६३४ आषाढ वद्य ११
जखार २४          )        श्री.        ( इ. १७१२ जुलै १८

( आरंभी " श्रीराजारामचरणोत्पत्तीर्मालोजी घोरपरे: सुतस्य
श्रीरजेर्मुदा षण्मुखास्यैव राजते " असा चौरस शि. )

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विस्वासनिधी राजमान्ये राजश्री हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार ता। मोकदमानी मौजे अकीवाट का। मुनोली पा। हुकेरी सुहूर सन सलास असर मया अलफ मौजे मजकूर पेसजी राजश्री बहिरजी गाईकवाड याच्या जमावास मुकासा होता तो दूर करून हाली राजश्री लखमगौडा वलद सबव प्रभू याच्या जमावाचे बेगनीस मुकासा दिल्हे असे तरी तुम्ही मारनुलेच्या असे प्रा आबादी करून मौजे मजकूर खंडणी आकार प्रा मुकासबाबेचा यैवज बिलाकुसूर वसूल देत जाणे जाणिजे रा। छ २४ जमादिलाखर पा। हुजूर (चौरस) लेखाना मर्यादा.

ले. १२ मु. ११२५)                    ( श. १६३६ आश्विन शुध्द ६
सवाल ४          )    श्री ( निं ) सुबराज ( ई. १७१४ ऑक्टोबर ३

( क्र. ९४ प्रा शि. )

आज्ञापत्र समस्तराजकार्येधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री सिदोजी हिंदुराऊ धोरपडे ममलकत मदार ता॰ मोकदमानी मौजे मलिकवाड का॰ सदलगे प्रा॰ हुकेरी सु॥ खमस असर मया अलफ राजश्री नारो शंकर याणी येऊन विनंती केली की, राजश्री लिंगपा प्रा॰ हुकेरी माी नणादी याचे भक्तीस श्री ( मो.जा. ) स्वामी येऊन पूजा घेताती लिंगपा देसाई निस्टेन पूजा करिताती परतु सूक्ष्म विचार सर्व चालिला पाहिजे यस जाणून हूजूर राजश्री ( मो. जा. ) स्वामीस विनंती केली त्यावरून राजश्री ( मो. जा. ) स्वामीनी कृपाळू होऊन मौजे मजकूर इनाम करून देऊन सनद सादर केली आहेयसिवा सि साहेबाचा जिल्हा आपणाकडून सुकासे चालिले आहेती ते दूर करून हुजरातीच्या सनदप्रा॰ इनाम करून देविले पाहिजे म्हणून विनंती केली त्यावरून मनास अणून धर्मकृत्याचा प्रसंग देसाई याची येकरूप भक्ती पाहून हुजूर कराजश्री ( मो. जा. ) स्वामीच्या सनद प्रा॰ सुकासियाचा मुकासाद दूर करून श्री ( मो.जा. ) स्वामीचे पूजेस नणादीकर देसाई याकडे इनाम करून दिल्हे असे तरी तुम्ही माइलेच्या आज्ञे प्रा॰ राहून खोरीज हकदार व इनामदार करून यक्ज बिलाकुसूर देत जाणे वस्म प्रतिवर्षी नवीन पत्राची अपेक्षा करीत नव जाणं या पत्राची प्रति लहऊन घेऊन मुख्येपत्र देसाई प्रा॰ हुकेरी माी नणादीकर याजवळी देणे जाणिजे छ ४ सौवाल ( नि. ) प्रा॰ हूजूर ( चौरस. ) लेखन मर्यादा.

ले. १३ सु. ११२५ ) ( श. १६३६ आश्विन शुध्द ६
सवाल ४ ) श्री (नि ) सुबराज ( इ. १७१४ आक्टोबर ३

(सुबया (उपान्त्य २ ओळींच्या डावे अंगास ले.१४ प्रा॰ शि )

राजश्री सरदारानी पागा व जमायेतदार व कारकुनानी
गोसावी यांसि.

ई अंखाडितलक्षामी अलंकृत राजमान्य ( मो.जा. ) श्री सिदोजी हिंदूराऊ घोरपडे ममलकतमदार जोहार अनुक्रमें दंडवत मु ।। खामस असर मया अलफ राजश्री लिंगपा देसाई पा ।। हुकेरी मौ नणादी याचे भक्तीस श्री ( मो.जा. ) येऊन पूजा घेतो देसाई याचा मामला वतनदारीचा श्री ( मो.जा. ) या सर्व चालिला पाहिजे येसे जाणून हुजरून राजश्री (मो.जा) स्वामीनी मौजे मलिकवाड का ।। सदलगे पा ।। हुकेरी हा गाऊ इनाम करून दिल्हे आहे ते प्रा ।। हाली करार करुन मौज मजकुरास सनद सादर केली असे तरी तुम्ही मौज मजकुरास काडीचा उपद्रव न देता सुखारूप इनाम चालो देणे या गावास जो कोण्ही तसबीस देईल त्यास आपल्याच्या - स्वधर्माची आण येसे जाणून निरुपद्रवे चालवणे बहुत काये हून देणे जाणिजे छ ४ सौवाल बहुत काये लिहिणे ( चौरसं ) लेखान । मर्यादा.

ले. १४. १३५६ आनंद, ) ( श. १६४०
सु. ११११ ) श्रीरामसमर्थ ( इ. १७१८

तालीक

ई सौजन्यश्री मोकदमानी का ।। त नोडी यासि सिरपीनाईक वलद इमडिनाईक देसाई का ।। मजकूर ठाण्या नेसरी वावडी कराड सुा समानीन व तिसा मियत असरैन मया अलफ शकें १३५६ अनदनाम संवत्छरे रा ।। येमी मली नाईक याविसीं हुजूरील फर्मानपत्र अम्हास आलें जें फोंडिचें मसलत याणिं कलें येविसी मेहरबान होऊन क होऊन कर्याती मजकुरायें सरनाईकीचे वतन करून दिल्हे अहे सूर्य चंद्र असिजे परियेत चालवणे -



8780
A

म्हणाऊन त्या ताकिदेवरुन तुम्हा गावकरांस ताकीदपत्र दिल्हे अहे जें दर गांवगना हक होनू येन १ व गला १ कुडो व तूप ५ व झोला दर मागास - दुवल व बेगारी बाारा अटोडी होन । घारणा येकून ४३ शेताल गावकर येणेप्रमाणे सरनाईक मजकूर यांस पाविवीत जाणे प्रतिवर्षी ताकीदपत्राचे आपेक्षा न करणे देविलेंप्रमाणे सुरलीत चालवीत जाणे असल पत्राचे तालीक घेऊन मुख्यपत्र सरनाईक मजकूर याच्या भोगवटेस देणे हे व यांचे वंशपरंपरेने वृती अनुभाव करितील जाणिजे रा छ ९ माहे सफर

( डाव्या अंगास नांगर, नि.ं ) नांगराबराबरी
बिा तिमाजी गोविद देश कुलकर्णी काा मार

ले. १५ सु. ११९९, विलंबी ) ( श. १६४०
) श्रीरघुवीर ( इ. १७१८

अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्यें राजेश्री सिदोजी निंबाळकर देसाई सरनाईक पाा हुकेरी गोसावी यांसी

ई श्रों आदिगोडा बिन नेमगोडा व भरमगौडा फर्जेद आदिगोडा पटेल कसबे कापसी शेरणाशेरणाभ्यर्थी विनंति सुहूर सन तिसा अशेर मया अलफ उर्फ विलबीनाम संवछरे लिहून दिल्हे वृतीपत्र येसें जें कसबे मजकूरचे पटेलगीचे वतन अपणा पागर या पटेल आपले बापभाऊ देखील कुल व ( त.ं ) नावरी राबत असतां कसबे होता त्यानें आपलें वतन म्हणाऊन टोगाई करुन कटकट करु लागला त्यामुळे व वतनामुले पोट चालेना म्हणाऊन आमचे बापभाऊ होते ते उठोन देशावरी गेले आपणा वडिलाचे वतन बुडऊ नये म्हणाऊन उपवास आणास करुन पादरी

..४३/-

वरी राहिलों घुग-या कटकट करुं लागला त्या गांघातें येक दोनी घाळामध्यें व्यव्हार केला घाळा मध्यें घुग-या वडील केला परुंतु घुग-या टोगाई करुन गावावरी व आपणावरी दावे करुं लागला गावमध्ये मोकान-साई दिवाण अगर देसाई देसपाडे आपली दाद न दे ( घो ) तां आपला योगक्षेमही चालेना आणि वतनावरी कुणबीही मुजाहीम होत चालिला आपणामध्ये येक दिवस आन्न खावियाची ताकद नाही आणी आपलें बापभाऊही कोणी जवळी नाहीत त्यानींही वतनाचीं सांडी केली वडिलांचे बुडऊन कुणबियाच्या घरास जाऊ देउं नये आणि वतन थोर असतां पोटावीण आपण व पोरहोरे मरों देऊ नये म्हणाऊन आम्ही बापलेक उभयेता निपाणीच्या घालास स्वामीपाशी येऊन आवांत वर्तमान निवेदन करुन आपल्या अत्मसंतोशे समस्तम भाग येक व वतनदार लोक यांच्या साक्षी करुन आपले पटेलगीचे वतन कुल बाब दाारी इनाम हक वर्तना महक्त ( त ) कदीम पूर्वावार चालिले आहे त्याप्रमाणे निमे वतन कुल बाब लिहून दिल्हे असे पटेलकीचे वतन भोगवटा नांगर आपल्या घरी व

| | | |
|---|---|---|
| इनाम व पालक | येन हक दर सदे होनु | कानू बाब होनु पाा |
| यैन इनाम | पाा ५ आहेत ते | ३ घोगडे बाा |
| मली | पूर्वावार चालिले प्रा | २ कलक बाा |
| कालसैत | घ्यावे | ५ |
| | गला दर सदे पांच खडी | |
| ६ पालक | आहेत ते भोगवटे | तेल दर घाणेस |
| ८ | प्रा घ्यावे | वजन |
| वटलदान | राबिता म्हार १ | उभामार्ग |
| होर्सिंगाकडे | | ८१ गाणीस रुका |

| | | |
|---|---|---|
| रु ।। ६ | | १००..मानपान |
| कोस्टियास संपडदान | गुलारास दरघाणोस १ | लक्ष्मी वडिले घरी |
| दरमागास स्के.।४ | १ गुंलाची भोस | जेवावी १ |
| भावॅईचा दिवा | १ उस ५ दररोज | पोली सिमगि- |
| आपल्या | १ रस घागर | याची आपले |
| घरी १ | | |

बाजे बाब वतनमुळे पुर्वापार घाराची १
चालिले अहे ते कुल घ्यावे

येणेप्रमाणे पूर्वापार चालिले आहे ते कुल बाब तुम्हास निमे लिहून दिल्हे असे व नांगर तुम्ही करावा दिवणास व मान्कानी पंचाइती पानमान आम्हीं आपले अत्मसतोशे तुम्हास दिल्हे आम्ही इनाम इजारती बापभाऊ आमचे आहे ते देखील निमे अनभाउन सुखास्प राहावे तुम्ही आमचें पोट आनवस्त्र सुरक्षित चालवावे व आमचा पुत्र भरमागौंडाचे लग्न करावे पेस्त गावामध्यें आम्ही राहिलियावरी आमचे भाऊबंद जे असतील त्यास आमच्या निमे तकसीमेमध्ये समजोन घेऊ त्यानी कटकट खोकला केला तरी आम्ही वारून घे ( दे ) ऊ आमचा वतनी जागा घरबंद आहे त्यापैकी निसे जागा आमच्या बापभावाचा वेगळा करून तुम्हास दिल्हा असे नांगर पानमान तश्रीफ तुम्हास दिली असे या गोष्टीस आपले सुकतें पंचाईत विदमाने लिहून दिल्हे असे यास अंतर जाहालियां आपले पूर्वज अधोगतीस जातील हे लिहून दिल्हे पत्र सही

सदरहू लिहून दिल्हे प्रमाणे तुमचे वंशपरंपरा पुत्र पौत्री व आमच्या पुत्रपौत्रीदी वंशपरंपरेने चालवयास तुमच्या वंशाजानी इस्कील केलिया व आमच्या वंशजानी इस्कली केलिया आपल्या स्वधर्मांची शोफ्त असे.

ले. १६ सु. ११११ ( श. १६४१ ज्येष्ठ शुद्ध ६
रजब ५ अखेर साल ) ( इ. १७१९ मे १४

माहाराज राजेश्री सिदपा देसाई सरनाईक पा। हुकेरी स्वामीचे सेवेशी

कबूलकताब बाा। सिरोजी पटेल व बसोजी पटेल व सिदोजी पटेल मौजे हिगलज का। साटी सुा। तिसा आसर मया आलफ कारणे ( मो.जा. ) लिहून दिल्हे कबूलकतबा ऐसा जे मौजे मजकुरावरी - स्वामियानी स्वारी केल गाव मारिले तेथे येक झाला माणूस सिपाई राहिला होता त्यासी चौघा बेडग मिलऊन मारिले त्यामध्ये फुलवा पटेलणीसी धरून आणिल होते तिसी दस्त करून ठेविले तिचे उस्तवारी कोणी केली नाही मग तिने चौघा झाले लोकानसी बैसोन कबूल केले रुा। ५०० पाचे सेहे कबूल केल अहे यासी मुदती माहे रजबमधे चारी हफ्तामधे झाडेनिसी पैके पावत करून देऊ मुदतीसी जरी चुकली पचोत्रापुा। कलतरे देखील हिसोब करून स्वामीचे पैके झाड करून देऊ यासी अतर पडणार नाही हे आपले वडिलाचे मुकुत तेरीख छ ५ मोहे रजब ( नांगराचें चित्र )

गोही

१ सताजी जाधव १ नेरोजी पोवार

१ खाडोजी पावार मा।

गलगा

१ लिगोजी पोवार

ले. १७ सु. ११२० ) ( श. १६४१ मार्गशीर्ष शुध्द ११
सफर १० ) श्री ( इ. १७१९ डिसेंबर ११

राजश्री तमाजी परगौडा देसाई व सरनाईक पा। हुकेरी गोसावी यांसि

ई अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रीके कृष्णाजी परशराम प्रतिनिधी आसीर्वाद सुहूर अशरैन मया व अलफ कुडालच्या कोटास सावतानें वेढ घालून जेहर केले याकरितां माहाराज राजश्री ( मो.जा. ) छत्रपति स्वामीनी कोट मजकूरचा उपराला करून गनिमास नतीजा पोंहचवावयाबदल रवाना केलें त्यावरून किले पनालियाचे मुकामींहून स्वार होऊन घाले उतरलों आणि तुम्हास स्वामीकार्यादिल जमावासहित यावयाची आज्ञा करून राजश्री बहिरो वेकाजी हे तुम्हास आणावयास पाठविले त्यावरुन तुम्ही जमावानसी मसलतेच्या कार्यास अंगेज करून आलेस आणि विनंति केली की आपण वतनदार वतनसमंधी आपल्या परगणियांत सेवा करावी मसलतेचा धंदा म्हणजे सरदार लोकांचा आहे त्याहीमध्यें राजश्री ( मो.जा. ) शाहुराजे याकडील फोजाहि पनाले प्राति आल्या यामुलें आपल्या परगणियामध्यें धुंदी फारच जाहाली येशा प्रसंगांत यावें तेव्हा आपल्या समागमें वतनसंमधी जमाव आहे मसलतेस यावें तेव्हा जमावाची बेगमीं करावी लागते मागें धामधूम जाहलि यामुले लोकांही आड घातले आणि स्वामीनही मसलतेस यावयाची आज्ञा केली त्यावरून स्वामीकार्याचें जरूर जाणोंन

विनंति केली की आपणा वतनदार मसलतेस यावें लोकांची बेगमी व्हावी त्यास आपणामध्यें कांही अवकात नाही तरी स्वामीनी मेहेरबान होऊन नूतन इनामगांव करून दिलेयानें त्या आश्रियावरी कर्जवस करून लोकाची बेगमी करून देऊन मसलतेस जमावानसीं राजश्री सिदोजी निंबालकर आपले चुलते देऊन सेवा करून म्हणून विदीत केले त्यावरून मनास आणितां कुलालया कोट बहूत जेहर जाहाला आणि मागें राजश्री शाहुराजे यांकडील फौजांचा शाहा जबर पडिला लोक कोणी मसलतेस पाये न घेत येशामध्यें तुम्ही अंगिजणी करून जमावानसी येऊन सामील जाहालेत राजश्री सिदोजी निंबालकर याणींही बहूत निष्ठेने सेवा केलि याबदल तुम्हावरी कृपाळू होऊन नूतन इनाम खोरीज हकदारव इनामदार करून दिले गाव बितपशील

| | |
|---|---|
| मौजे खानापूर का। मजती | मौजे बेनाडी का। सावगाऊ |
| पा। मजकुर देह १ | पा। मजकुर देह १ |
| मौजे चिंचवड का। आलते | मौजे जत्राह का। लाट प्रा। |
| प्रा। मार देह १ | मजकूर देहे १ |
| मौजे गोटर कार्याति | लग |
| मुनुली देह १ | ० |

येकून पांच पा। मारचे इनाम करून दिले असेत सदरहू गांव खोरीज हकदार व ( नां ) मदार करून इनाम स्वामी कार्यास्तव दिले असेत पुत्रपौत्रादि वंशपरंपरनेने इनाम अनभाऊन सुखास्प राहाणें जाणिजे ( निं ) छ १० सफर ( निं ) निदेश समक्ष ( अष्ट. "लेखा । नावधी । मुद्रा"-; पाठीवर " श्री आई आ । दि पुरूषा श्रीराजा । शुंभ छत्रपती स्वा । मी कृपानीधी तस्य स कृष्णाजी परशाराम । म प्रतीनीधी " असा शि.") बार सुरू सूद बार

ले. १८मु. १२२० ) ( श. १६४१ मार्गशीर्ष शुध्द १२
सफर ११ ) श्री ( इ. १७१९ डिसेंबर १२

राजश्री देशाधिकारी व देशलेखन वर्तमान व भावी
पा। हुकेरी गोसावि यांसि

ई अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो। कृष्णाजी परशराम प्रतिनिधी नमस्कार सुहूर सन अशरीन मया व अलफ राजश्री तमाजी परवगौडा निंबालकर देसाई व सरनाईक पा। मजकूर यांही कुडालचे मसलतेची आगेजणी करुन स्वारीबा। आपले चुलते राजश्री सिदोजी निंबालकर देसाई याजबा। जमाव पोख्ता देऊन मसलतेच्या प्रसंगास सेवेसी सामील होऊन येकनिष्ठेने सेवा केली याकरितां याजवरी संतोषी होऊन यास परगणे मजकूरपैकी पेशजीच्या मुकासियाकडून दूर करुन देह पांच इनाम करुन दिल्हे असेत बितपशील

दिल्हे असेत बितपशील

| | |
|---|---|
| मौजे खानापूर का। मजती १ | मौजे बेनाडी का। सांवगाव १ |
| मौजे चिंचवड का। आलते १ | मौजे जत्राट का। लाटी देह १ |
| मौजे गोठूर का। मुनुली १ | लग ० |

येकूण देह ५ पांच खेरीज हकदार व इनामदार करुन जलतरुपाषाणासहित निधीनिक्षेप इनाम यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करार करुन दिल्हे असेत तरी देहाय मारचा येवज होईल तो मारनुलेकडेस पावेल या पत्राची तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियास परतोन देणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे जाणिजे छ ११ सफर ( नि.॰ ) निदेश समक्ष (अष्ट. "लेख नावधी मुद्रा॰ )

बार सुरुसुद बार (पाठीवर ले. १०१ प्रा॰शि.॰ )

ले. १९ मुहम्मदशाही )  ( श. १६४३ मार्गशीर्ष वद्य ३
जु. ५ रवल १६ )  ( इ. १७२२ डिसेंबर १४

जुबदतुल अमासिल वल येकरान लखमगोडा देसाई नाडगोडा देसाई पा। हुकेरी सरकार अजमनगर उमेदवार बूदे बिदानंद दरी विला वकील इसमत पनाही सोयराबाई बालिदे शाहमतपनाह पिरोजी घोरपडे सेनापति जाहीर केले की मौजे पट्टणकुडी असले पा। लाट बमोजीब परवाना दरवज इनाम आपणास मोकरर असतां तुम्ही बेमोबलग पैके मौजे मजकुरी साल गु। घेतले दाम दिरम आपणास दिल्हे नाहीं म्हणोंन अर्जी माने खुब केले नाही मेवायेद के जवरी इजानेब धरी मुलकात आहे व मौजे मजबूर जाहीर ता। सरकार बाहल व बरकरार आहे तंवरी मशारइयेस मौजे मस्तुर इनाम बरकरार मुस्तकील जाणोंन त्याचे गुोस माल वाजिबी जबाब देत जाणे कोणे बाबे मुजाहीम न होतो मौजे मजबूर त्याचे ताळुक करून दीजे दरी बाब ताकीद आकीद असे बताहीख १६ माहे रबिलोवल सन ५ जुलूसवाला कलमी सूद ( बैजा )

ले. २० रा.श. ५३ पराभाव  ( श. १६४८ आषाढ शुध्द ७
आषाढ शुध्द ७ मंद, सु. (११२ )७) श्री  ( इ. १७२६ जून २५
जिल्काद ५

( ४ व ५ ओळींच्या डावे अंगास प्रधान व प्रतिनिधी यांचे शि. )

..५०/-

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५३ पराभवनाम संवछरे आषाढ शुध सप्तमी मंदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्रीराजाशंभू छत्रपति स्वामी याणी राजश्री मुद्राधारी व कारकून वर्तमान व भावी किले पराक्रमगड यांसि आज्ञा केली ऐसी जे हरिभक्तिपरायण तारागिरि महंत बहूत थोर तपस्वी होते त्याणी किलेमाारचे पेठेस वैकुंठवास केला त्याचे थडे हवालदाराचे मल्यामध्यें बाधावें लागतें तेथें बागबागशाई फुलझाडे लावावी दिवाबती चालावी लागते याकरिता स्वामीनी नूतन इनाम कुल बाब कुल कानू खेरीज हकदार व इनामदार करून मौजे गुंमटापूर ताा हवेली कोपल नजीक किले माार बिघे ५ पाच बिघे जमीन इनाम अज रा म-हामत करून दिल्हा असे तरी तुम्हीं सदरहू पांच बिघ्यामध्ये मल्याची जमीन काये भरेल ते नेमून उरली जमीन मल्याचे पश्चिमभागी पड जमीन नेमून देणें आणि सदरहू पांच बिघे जमीन त्याचे शिष्य राा धानशामगिरि याचे स्वाधीन करणे आणि उतरोतर चालवणें या सनदेची तालीक लीहोन घेऊन असल सनद भोगवट्यास परतोन देणें जाणिजें ( नि. ) निदेश समक्ष ( अष्ट. व १२ दली शि. ) मर्यादेयं ा विराजते (पाठीवर )
तेरीख ५ जिल्काद सु ाा सबा बार सुरु सूद बार

ले. २१ रा.श. ६० ( श. १६५५ कार्तिक वद्य ३
प्रमादी कार्तिक वद्य ३ भौम ) श्री ( इ. १७३३ नोव्हेंबर १३

स्वति श्री राज्याभिषेक शकें ६० प्रमादीनाम संवत्सरे कार्तिक बहूल त्रितीया भोमवासरे क्षत्रियेकुलावंतस श्रीराजा शंभू छत्रपति स्वामी याणी राजश्री वेंकटराव भास्कर यांसि आज्ञा केली

...५१/-

पैसी जे तुमचे विंती राजश्री बाबूराव विस्वनाथ मुग प्रधान व बलवंतराव सिवदेव व येशवंतराव मोहिते व नारो साबाजी यांणी विनंति केली पैशास राजश्री दौलतराव घोरपडे व राजश्री सुभानराव सिंदि सेनाखासखेल यांस मनसब्यास रवाना करायावया विचार करून दौलतरायांस हुजूर दर्शनास बोलाविले आहेत राजश्री सुलतानजी सिंदे यांस पाठविले आहेत हे स्वामीचे आज्ञेप्रमाणें तुम्हास सांगतील हे तुम्ही दौलतराव घोरपडे यांसमवेत हुजूर दर्शनास येणें दर्शना ( नं. ) तर मारनिलेंस स्वामी मनसब्याची आज्ञा करितील ( नि. ) बहूत काये लिहिणे (अष्ट १२ दली शि. ) मर्यादियं I विराजते

( नि. ) सुरु सूद बार ( नि. ) बार